Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-IV APRIL 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

अनेकान्त हाच तृतीय नेत्र : आचार्य श्री महाप्रज्ञ

प्रा. दिलीप नागरगोजे
तत्त्वज्ञान विभाग,
दयानंद कला महाविद्यालय, लातूर.

फार प्राचीन काळापासून या देशात यज्ञयाग करून देवतांच्या कृपाप्रसादाने अभ्युदय मिळवू पाहणारी जशी एक वैदिक परंपरा होती तशी शरीर क्लेशावर भर देऊन स्वतःच्याच तपोबलावर निःश्रेयस साधू पाहणारी दुसरी एक श्रमणपरंपरा होती. जैन दर्शन या श्रमण परंपरेतील होत.

जैन दर्शनात परंपरेने २४ तीर्थकर मानलेले आहेत. संसार सागर स्वतः पार करून इतरांना मुक्तीचे पथदर्शन करून मुक्ती प्रदान करणारा तीर्थकर म्हणून ओळखला जातो. यात पहिले तीर्थकर म्हणून भगवान ऋषभदेव असून भगवान महावीर हे चोविसावे तीर्थकर आहेत. भगवान महावीरांचा उपदेश हेच जैन परंपरेचे सार आहे. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी त्यांना 'जिन' म्हणजे विजेता असे म्हटलेले आहे. ते संसारिक युद्धात आपला पराक्रम दाखवणारे वीर नसून आंतरिक जीवनाच्या द्वंद्वावर विजय प्राप्त करणारे महावीर होते.

जैन दर्शनाच्या मूल धर्मग्रथांना आगमग्रंथ मानले जाते. जैन दर्शनाच्या मुळ सिद्धांतात अहिंसा, अनेकान्तवाद, नयवाद, स्यादवाद् हे सिद्धांत असून सम्यकज्ञान, सम्यक दर्शन, सम्यक आचरण ही त्रिरत्ने आहेत.

जैन मताचे श्वेतांबर आणि दिगंबर असे दोन प्रमुख पंथ असून त्या दोघांमध्ये सैद्धांतिक मतभेद फारच थोडे आहेत. जवळजवळ नाहीतच म्हटले तरी चालेल.

जैन दर्शनाच्या मुळ सिद्धांताचे विवेचन करण्याचा प्रयत्न किंवा त्या सिद्धांताचा विचार पुढे नेण्याचा प्रयत्न भगवान महावीराच्या नंतर अनेक संतांनी केला. त्यातील श्वेतांबर तेरापंथाचे दहावे संत म्हणून आचार्य महाप्रज्ञ यांचा नामोल्लेख होतो ते एक योगी, अध्यात्मिक, दर्शनकार, तत्त्वचिंतक, अधिनायक, लेखक, वक्ता आणि कवी होते. त्यांची अनेक पुस्तके आणि लेख पूर्व नाव नथमल या नावाने प्रसिद्ध आहेत. त्यांनी वयाच्या दहाव्या वर्षी जैन संन्यासी म्हणून धार्मिक जीवनास प्रारंभ केला व जैन तत्त्वज्ञानाच्या मुळ सिद्धांताचे विवेचन, त्याची उकल करून जन कल्याणासाठी प्रयत्न केले. अनेकान्तवादाविषयी पुढील प्रमाणे विवेचन केले.

आचार्य महाप्रज्ञ यांच्या मते जैनमत हा एक धर्म आहे. तसेच ते एक दर्शन म्हणजे तत्त्वज्ञान ही आहे. धर्म या दृष्टीने पाहता 'अहिंसा' हा त्यांचा प्राण आहे तर तत्त्वज्ञान या दृष्टीने पाहता 'अनेकान्तवाद' हा त्याचा पाया आहे. खरे म्हटले तर अनेकान्तवाद हा एखादा वाद किंवा सिद्धांत नसून जगाकडे पाहण्याचा तो एक दृष्टीकोण आहे असेही म्हणता येईल. अहिंसा या मूलभूत प्रेरणेतून अनेकान्तवादाचा जन्म होतो. अहिंसा म्हणजे हत्या न करणे एवढेच नव्हे तर दुसऱ्या जीवावर प्रेम करणे, मन उदार करणे. तेव्हा बौद्धिक पातळी वर अहिंसा किंवा भिन्नमत सहिष्णुता म्हणजेच अनेकान्तवाद.

अन्त म्हणजे कड, शेवट, निश्चित निर्णय अथवा एकान्त म्हणजे एकच एक निश्चय. अनेकान्तवाद म्हणजे कुठल्याही गोष्टीसंबंधी एकांतिकपणे मत न बनवीत कारण कुठल्याही गोष्टीला अनेक बाजू असतात, वस्तु 'अनन्त धर्मात्मके' असते असे त्यांचे मत आहे. तेव्हा वस्तु स्वरूपासंबंधीचा आपला गृह 'हत्ती' आणि पाच आंधळे या गोष्टीतल्या प्रमाणे नेहमीच एकांगी असणार ही जाणीव ठेवणे म्हणजे अनेकान्तवाद पत्करणे होय. कितीही प्रयत्न केला तरी वस्तूचे आपणास होणारे नेहमीचे ज्ञान व तिचे संपूर्ण स्वरूप यांमध्ये अंतर राहणारच. कारण नेहमीच्या ज्ञानात आपण वस्तुस्वरूपाचा कुठला तरी एकच अंत अथवा शेवट पकडीत असतो. हा दृष्टीकोन समजावून घेणे हाच अनेकान्तवाद होय.

आजचे आधुनिक युग सापेक्षवाद, समन्वय आणि सह अस्तित्व यांनी परिचित आहे. या शब्दांच्या पाठीमागे जो सिद्धांत आहे. जे विचार दर्शन आहे ते म्हणजे अनेकान्त आणि स्यादवाद.

या संसारातील प्रत्येक व्यक्तिला असे वाटते की मी जसे बोलेन तेच सर्वांनी बोलावे, मी जसा चालेन तसेच इतरांनी चालावे, मी जसे आचरण किंवा व्यवहार करेन तसेच आचरण किंवा व्यवहार करावे, अशी इच्छा सर्वांची असते. परंतु असे होत नाही. या संसारात जेवढ्या व्यक्ति तेवढ्या प्रवृत्ती आहेत. विरोधी विचार आहेत. त्यातूनच संघर्ष निर्माण होतो. नेहमी असाच संघर्ष सुरू राहील का? तो व्यक्ति आपले विचार इतरांवर लादत राहतील का? या व्यतिरिक्त असा कोणता मार्ग आहे का की त्या मार्गात विरोधकांच्या मध्ये राहून अविरोधी जीवन जगता

येईल. अनेक भेदाच्या मध्ये अभेदाचे जीवन जगता येईल असा प्रश्न निर्माण होतो. अनेकान्त या विचाराने या प्रश्नाचे समाधान पूरक असा मार्ग सांगितला व तो मार्ग म्हणजेच सहअस्तित्व होय.

सह-अस्तित्व प्रकृतिचा नियम आहे. आजच्या राजनीतिक जीवनात यावर अधिक भर दिलेला आहे. जीवनाच्या विभिन्न प्रणालित सह-अस्तित्व आवश्यक आहे. एक लोकतंत्र प्रणाली आहे तर दुसरी एकतंत्र प्रणाली आहे. या दोन्ही प्रणाली व्यवहारात प्रचलीत आहेत. त्या एकमेकांच्या विरोधी आहेत. यातील कोणती प्रणाली योग्य, कोणती स्विकारावी. या दोन्ही संदर्भात राजनीतिक अशी घोषणा केली गेली. या दोन्हीत सह-अस्तित्व असले पाहिजे.

सह-अस्तित्व स्वयंभू नियम आहे. जीवनात एक प्रकारचे द्वंद आहे. विरोधी विचार सोबत असणे हा प्रकृतिचा नियम आहे व या नियमास व्यक्ति जेव्हा समजतो तेव्हा विरोधास मिटविण्याची भावना समाप्त होते.

अनेकान्त व अहिंसा दोन नसून एकच आहेत. जर अनेकान्त नसेल तर अहिंसेचा विकास होत नाही. तसेच अनेकान्त व मैत्री ही सुद्धा दोन नसून एकच आहेत.

मनुष्य जीवनात यासाठी निराश होतो की तो अनेकान्तच्या नियमास जानत नाही तो हे ही विसरून जातो की कोणताच पर्याय शाश्वत नसतो. प्रत्येक पर्याय बदलत असतो. हा विचारच तारणारा आहे.

आचार्यजीच्या मते प्रत्येक मनुष्य पूर्ण ही आहे व अपूर्ण ही आहे. याचे कारण तो भाषा, चिंतन, स्मृति, कल्पना आणि बुद्धीच्या जगतात जीवन जगत असल्याने तो दोन्ही आहे जेव्हा आमची चेतना देश, काल यांच्या सीमा सोडून व्यापक होईल तेव्हा भूतकाल व भविष्यकाल समस्त होईल फक्त वर्तमान काळ राहील. कैवल्य प्राप्त करणारा तोच असतो की ज्याची चेतना व्यापक, अनंत असते.

अनेकान्त चे दोन सुत्र आहेत एक सत्याचा शोध व दोन सत्याच्या शोधात चालणारा असत्याच्या भूलभूलैयेत न अडकने ही दोन्ही सुत्र महत्त्वपूर्ण माणून चालणे.

अनेकान्तवादाचा अभ्यास करणाऱ्या व्यक्तिस मिथ्या दृष्टी प्राप्त होत नाही. त्यामुळे कोणते ही शास्त्र मिथ्या वाटत नाही. जेव्हा आपण या दोन्ही डोळ्यांनी पाहतो तेव्हा एक सत्य व एक असत्य, एक प्रिय व एक अप्रिय अनुभवास येते. परंतु तृतीय नेत्राने जर पाहीले तर प्रिय, अप्रिय असे काहीच न राहता फक्त पदार्थ राहतो व त्याचेच वास्तव, सत्य स्वरूप प्राप्त करून देणारे हे तृतीय नेत्र म्हणजेच अनेकान्त.

अनेकान्तवादाचे रहस्य तृतीय नेत्राचे उघडने होय. त्यांच्या मते या विश्वात कोणतीच गोष्ट सर्वथा नित्य ही नाही व अनित्य ही नाही. नित्य व अनित्य यांना पाहणारे नेत्र वेगळे असते परंतु तृतीय नेत्राच्या माध्यमातून केवळ सत्याचेच ज्ञान प्राप्त होते.

या विश्वात अस्तित्वात असलेला एक माणूस समानता पाहतो तर दुसरा असमानता पाहतो. परंतु या दोघांच्याही ठिकाणी तृतीय नेत्र उघडल्याने सम-असम असे काहीच दृष्टीस येत नाही. त्याच्या पलिकडे जाऊन वास्तवाचे ज्ञान प्राप्त होते.

तृतीय नेत्र उघडल्याशिवाय दार्शनिक आणि व्यावहारिक समस्या सोडवू शकत नाही. आजच्या वैज्ञानिक युगात व्यक्ती अनेक प्रवृत्तीत अडकून असतो अनेकान्तच्या माध्यमातूनच त्याचे समाधान करू शकतो.

आचार्य महाप्रज्ञजीच्या मते तृतीय नेत्र समता आहे. प्रत्येक व्यक्तीची दोन्ही नेत्रे जी आहेत त्यातील एक प्रिय व दुसरी अप्रिय असते. प्रिय अप्रियते मुळेच क्रोध समाप्त होत नाही. तृतीय नेत्र उघडल्याने क्रोध समाप्त होतो हे नेत्र समतेचे असल्यानेच पदार्थाप्रती सत्याचा, समतेचा भाव उत्पन्न होतो.

साधनेसाठी तृतीय नेत्राची आवश्यकता असते कारण हे नेत्र उघडल्याशिवाय विकास होऊ शकत नाही. जेव्हा हे नेत्र उघडते तेव्हा मनात साचलेला अशुद्ध विचार नाहीसा होऊन त्या ठिकाणी शुद्ध विचार अस्तित्वात येतात, त्यामुळे मन हे आरशा सारखे निर्मळ बनते व हेच मन साधनेसाठी उपयुक्त ठरते.

सर्व सामान्य व्यक्तिच्या मते तृतीय नेत्र हा दोन भुवयामध्ये असतो ज्या नेत्राने महादेवाने कामाचे दहन केले होते. तसेच योगाच्या मते आज्ञाचक्र हाच तृतीय नेत्र आहे. परंतु आपण अनेकान्त हाच तृतीय नेत्र कसे मानतात. यावर आचार्याचे असे मत आहे की, शरीरशास्त्र, मानसशास्त्र व कामशास्त्रच्या माध्यमातून सत्यतेचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी अनेकान्तवादाची आवश्यकता असते व ही आवश्यकताच तृतीय नेत्र होय.

अनेकान्तवादाची ही दृष्टी पदार्थाची द्रव्यात्मक व पर्यायात्मक नसून ती उभयात्मक आहे. आजच्या आधुनिक युगात वावरत असणाऱ्या व्यक्तिच्या असलेल्या अनैतिक काम वासनेच्या माध्यमातून अनेकांना हानी पोचत आहे. आचार्यांच्या मते, अनेकान्तवादाच्या या तृतीय नेत्राने अनैतिक काम वासनेचे दहन करता येते.

अनेकान्त वादाच्या माध्यमातून सृष्टीच्या सर्व समस्यावर विचार केला पाहिजे ती समस्या ही व्यवहारातील असेल, अध्यात्मातील असेल किंवा राजनितिक असेल त्या सुटू शकतात. एकान्त वादाने समस्या सुटत नाहीत तर त्या आणखीन गंभीर होतात.

मानवाने अनेकान्तवादाच्या दृष्टीकोणास समजले पाहीजे. अनेकान्त हाच तृतीय नेत्र आहे हा विचार मनात दृढ केल्याने आमच्या चेतनेचा व्यवहार सम्यक होऊ शकतो. आचार शास्त्रीय दृष्टीने विचार केल्यास हे स्पष्ट होते की आमच्या आचरणात पदार्थाचा घनिष्ट संबंध आहे. पदार्थाची प्रियता एक नेत्र, अप्रियता दुसरा नेत्र हे दोन्ही जेव्हा उघडे असतात तेव्हा आचरणाची पवित्रता समजू शकत नाही. आचरणाची पवित्रता तेव्हाच समजते जेव्हा तृतीय नेत्र उघडतो व हा नेत्रच समता आहे.

वैचारिक दृष्टीकोणातून तृतीय नेत्र तटस्थता आहे. एक वैचारिक व्यक्ति एक दृष्टीकोन स्विकारतो. दुसरा वैचारिक व्यक्ति दुसरा दृष्टिकोन स्विकारतो. त्यातून वाद उपस्थित होतो; परंतु जेव्हा या दोन्ही दृष्टीकोनाकडे तटस्थतेने पाहिले असता म्हणजे तृतीय नेत्राने पाहिले असता एकांगी दृष्टीकोन नाहीसा होऊन फक्त सत्यता शिल्लक राहते.

आचार्य महाप्रज्ञ यांच्या मते अनेकान्दवादाचा स्विकार केल्याने जीवन संतुलित बनते, संयम, साम्य व समता अनेकान्तनेच प्राप्त होते. समस्यांचे समाधान होते. जीवनाचा आधार अनेकान्त आहे. म्हणजे त्याचे ज्ञान होय जे दिसते ते जीवन नाही तर या जीवनात दोन तत्त्व कार्यरत असतात एक द्रव्य आणि दुसरा पर्याय. ज्ञान हे द्रव्य ही आहे व पर्याय ही आहे. ते एक ही आहे व अनेक ही आहे. म्हणून आपल्या जीवनाचा मूल आधार ज्ञान आहे.

अनेकान्तवादानुसार त्याग, अहिंसा, संयम, अपरिगृह हीच आशावादी दृष्टीकोणाची सुत्रे आहे या सुत्रानेच मानवी जीवनाचा सर्वांगीन विकास साधता येतो. व कोणत्याही गोष्टीकडे एकांगी दृष्टीकोन न ठेवता अनेकान्तवादी दृष्टीकोन ठेवतो. त्यातच मानवी जीवनाची सार्थकता, निःश्रेयेस आहे.

आचार्य महाप्रज्ञ यांच्या मते अनेकान्तवादाचा उद्देश आपल्याच विचारांना सत्य मानने व विरोधी विचारांना मिथ्या, असत्य मानने या हटवादी विचारास रोकणे हा आहे. तसेच त्यांचे एवढेच म्हणणे आहे की, तृतीय नेत्राने म्हणजे अनेकान्तवादी दृष्टीकोणातून पाहिले तर ज्या प्रमाणे आमचे विचार सत्य आहेत, त्याच प्रमाणे विरोधकांचे ही विचार सत्य असू शकतात. आपण विरोधकांच्या मतास मिथ्या मानू नये कारण अनेक वस्तूत परस्पर गुणधर्म असू शकतात व ते सत्यच असतात.

संदर्भ ग्रंथ :

१. भारतीय दर्शन - डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन
२. जैन दर्शन - डॉ. उदय कुमठेकर
३. भारतीय दर्शन - शोभा निगम
४. भारतीय दर्शन - श्रीनिवास दीक्षित
५. भारतीय दर्शन संग्रह - आचार्यभक्त पं. द. वा. जोग
6. भारतीय तत्त्वज्ञानाचा ब्रहद इतिहास खंड तीन - डॉ. ग. ना. जोशी
7. अनेकान्त ही तिसरा नेत्र - आचार्य महाप्रज्ञ

ISSN 2349-638X
www aiirjournal.com